# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३४३-२२** **दिनांक १८/११/२०२२**

## ओडीसा राज्यातील अल्पवयीन मुलीच्या खुनातील तीन महीन्यांपासुन फरार असलेल्या आरोपीतांस पकडण्यात वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

दिनांक- १७/११/२०२२ रोजी राज्य- ओडीसा जिल्हा गंजगम, पो.ठाणे- कोडाला पोलीस ठाण्याचे पोलीसांनी वालीव पोलीस ठाणे येथे येवुन पोलीस मदत मिळणेकामी रिपोर्ट देवुन कोडाला पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ४२४/२०२२ भादंविस कलम ३०२, ३०६, २९४, ५०६, ३४ या गुन्हयातील आरोपीत हा गुन्हा करुन तीन महिन्यांपासुन फरार झालेला असुन तो पालघर वसई पुर्व परीसर कोठेतरी कंपनीत काम करत असलेबाबत माहीती दिली. परंतु वसई परिसरात मोठया प्रमाणात औदयोगिक वसाहत असल्याने आरोपीत हा नेमका कोणत्या कंपनीत काम करत असावा याबाबत काही एक माहिती नव्हती व आरोपीत याने गुन्हा केल्यापासुन फोन वापरणे बंद केले होते अशा स्वरुपाची माहिती देवून पोलीस मदतीची मागणी केली.

त्यानुसार सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर पथकासोबत वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी वसई औदयोगिक परिसरात जावुन आरोपीत याचे गावाकडील कोण-कोण लोक वसई परिसरात कंपनीत काम करतात याबाबत शोध घेत असतांना माहिती मिळाली की, आरोपीत हा सातीवली परिसरातील लक्ष्मी इंड्रीस्ट्रीयल या कंपनीत काम करत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. लक्ष्मी इंड्रीस्ट्रीयल परिसरात त्याचा शोध घेतला असता तो कामावरुन घरी गेले असलेबाबत माहिती मिळाल्याने आरोपीत याचे राहते पत्त्याचा शोध घेवुन आरोपीत राहत असलेल्या ठिकाणी सापळा रचुन त्यास ताब्यात घेतले व पुढील तपासकामी संबंधीत पोलीस पथकाचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग, अतिरिक्त कार्यभार सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.मिलींद साबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, सपोनि/ज्ञानेश फडतरे, पो.हवा, मनोज मोरे,राजेंद्र फड, पो.ना/बाळु कुटे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




---ooo---